22 OCT 2026
सकाळ

डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्ययन आणि नेहरू अभ्यास केंद्रातर्फे उद्या, गुरुवारी सकाळी अकरा वाजता जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे व्याख्यान होणार आहे. 'जल संवर्धनाच्या माध्यमातून विकास : महात्मा गांधी आणि अहिंसक विकास' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. आर. के. कामत, तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित असतील.

22 OCT 2026

पुढारी

सुर्वे यांची कविता सांस्कृतिक लोकशाहीची प्रस्थापना करणारी : देशपांडे

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

कवी नारायण सुर्वे यांची कविता सांस्कृतिक लोकशाहीची प्रस्थापना करणारी होती, असे प्रतिपादन अभ्यासक प्रमोद देशपांडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात वाचन कवी नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित 'सूर्यलोकाची सनद' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

देशपांडे म्हणाले, सुर्वे यांनी सामान्य माणसाच्या भुकेचे वाचन करून तळातील माणसांना कवितेच्या केंद्रस्थानी आणले. जगण्याची परवानगी नाकारणाऱ्या व्यवस्थेत सामान्य माणसासाठी सूर्य हे त्यांच्या कवितेतील आदर्श प्रतीक होते.

मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे म्हणाले, सुर्वे यांच्या कवितेने वंचित आणि दलितांच्या जीवनाला अभिव्यक्ती दिली. कष्टकऱ्यांच्या जीवनावर श्रमाची राजमुद्रा उमटवली. व्यक्तिगत आत्मकथनातून सामूहिक जीवनाचे चित्रण करत स्त्रियांच्या जीवनाकडेही उन्नत भावदृष्टीने पाहिले. अशा माणुसकीच्या झऱ्याला स्मृतिवंदना करणे ही सांस्कृतिक जबाबदारी आहे. कार्यक्रमात अरुण खोपकर दिग्दर्शित 'नारायण गंगाराम सुर्वे' हा माहितीपट दाखविण्यात आला. विष्णू पावले आणि करुणा उकिरडे यांनी सुर्वे यांच्या कवितांचे वाचन केले. प्रांजली क्षीरसागर यांनी प्रास्ताविक केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले.

22 OCT 2026

तरुण भारत

शिवाजी विद्यापीठामध्ये जागतिक अन्न दिन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान अधिविभागा मार्फत राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी १९ रोजी जागतिक अन्न दिन साजरा करण्यात आला.

अधिविभागातील विद्यार्थ्यांनी अन्नपदार्थ, अन्न प्रक्रिया उद्योग व अन्न संवर्धन या विषयी असलेल्या गैरसमजुती बाबत प्रबोधन करणारा अन्नप्रक्रिया उद्योग: गैरसमजाच्या पलीकडे हा लघुपट व अशीच प्रबोधनात्मक २५ रिल्स व शेतकऱ्याच्या समस्या यावर प्रकाश टाकणारा मूकपट या सर्वांचे प्रदर्शन आयोजित केले होते.

यावेळी कुलगुरू प्रा. डॉ. राजनीश कामत यांनी उपस्थिताना मार्गदर्शन करत असताना जागतिक अन्न दिन का साजरा केला जातो, आजचे नवनिर्माण कसे भविष्यातील अन्नाची गरज भागविणारे असणार आहे तसेच एआय व शेतीची सांगड घालून आधुनिक पद्धतीने शेती करण्याची गरज असल्याचे सांगितले.

तत्पूर्वी अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान अधिविभाग प्रमुख डॉ. प्रवीणकुमार पाटील यांनी प्रास्ताविकामधे जागतिक अन्न दिनाचे महत्व विषद केले. जागतिक अन्न दिनी सर्व उपस्थितांनी अन्नाची नासाडी टाळण्याची व ते काळजीपूर्वक वापरण्याची शपथ घेतली. यावेळी प्र-कूलगुरु डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रभारी संचालक उपस्थित होते.

जागतिक अन्नदिनी प्रदर्शित करण्यात आलेला लघुपट, मूकपट व रिल्स हया शिवाजी विद्यापीठाच्या शिववार्ता ह्या **youtube** चॅनेल वरती उपलब्ध करण्यात आलेले आहेत, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सर्वांना केले.